**Indian Streams Research Journal**
**Vol -1 , ISSUE –2, March – 2011**
**ISSN:-** 2230-7850

**ORIGINAL ARTICLE**

# इंटरनेटचे महाजाल आणि मराठी साहित्य

**संजय संभाजी लांडगे**

सहयोगी प्राध्यापक, अे.आर. बुर्ला कॉलेज, सोलापूर.

## प्रास्ताविक :

मराठी भाषेला हजार वर्षाचा इतिहास आहे. मराठी भाषेची सर्वात प्राचीन लिखित रुपं आपणास जुन्या मुर्ती, शिलालेख व प्राचीन साहित्यातून आढळतात. इ.स. ११९६ मध्ये श्रवणबेळगोळ येथील शिलालेखावर कोरलेली दोन वाक्ये 'श्री चामुण्डराजे करवियले, श्री गंगराजे सुत्ताले करविले' ही मराठी भाषेची पहिली लिखित अक्षरे मानली जातात. त्यानंतरच्या मुकुंदराजापासून ज्ञानेश्वर तुकारामपर्यंत ते आजच्या खांडेकर माडगुळकरापर्यंत हजारो ग्रंथ मराठी भाषेत लिहिले गेले. नव्या दमाचे नवे साहित्यिक नव्या नव्या अंगाने लिहू लागले आहेत. आजच्या काळात प्राप्त झालेल्या विविध माध्यमांचा वापर करून नव्या लेखकांनी आपली लेखणी मोठ्या कल्पकतेने हाताळली आहे. इंग्रजी ही साऱ्या जगाची ज्ञानभाषा आहे. वैश्विक संस्कृतीपर्यंत पोहोचविणारे तिच्यासारखे समृद्ध भाषा माध्यम दुसरे नाही. पश्चिमेकडील विविध ज्ञानशाखांतील प्रवाह भारतीय भाषामध्ये येऊन पोहोचत आहेत. ते इंग्रजी भाषेद्वारेच.[१] त्यामुळे इंग्रजी-मराठी साहित्य संस्कृतीची देवाण-घेवाण वाढली आहे. माहिती तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात इंटरनेटमुळे ही देवाण-घेवाण सहज व सुलभ झाली आहे.

नव्या दमाच्या लेखकांनी संगणकाशी मैत्री करून इंटरनेट बेवसाईट, ई-मेल, ई-बुक, ई-रिडींग अशा कितीतरी गोष्टींचा वापर करून आपले साहित्य विश्वव्यापी बनविले आहे. आपणाला मिळालेल्या या नव्या तंत्रज्ञानाचा वापर करून त्यांनी मराठी साहित्य विश्वाच्या कक्षा रुंदावल्या आहेत. इंटरनेटवर असणाऱ्या विविध मराठी संकेत स्थळाचा वापर स्वतःसाठी व रसिक प्रियजनांसाठी करत या नव्या दमाच्या साहित्यिकांनी आपले साहित्य व साहित्य संमेलने देशाबाहेर सर्वत्र जगामध्ये पोहचवली आहेत याचे श्रेय त्यांना द्यावेच लागेल. इंटरनेटवरील आद्ययावत माहितीचे भांडार स्वतंत्र व मोफत आहे. त्यावर कोणत्याही संस्थेची, राष्ट्राची हुकूमत किंवा मालकी चालत नाही. खरे तर माहितीच्या या भांडाराचा दररोज विस्तारच होत आहे.[२] इंटरनेटच्या ई-मेल किंवा चॅटिंग या सेवांद्वारे तुम्ही जगाच्या पाठीवर कोठेही असणाऱ्या तुमच्या मित्रांशी संपर्क करू शकता. हे तर सर्व ज्ञातच आहे. मात्र ऑर्कुट, फसबुक, मायस्पेस, हायफाईव्ह, बेबो, फडस्टर यासारख्या वेबसाईटद्वारे तुम्ही ज्याचा तुम्हाला कोणताही पत्ता माहित नाही. अशा जुन्या मित्रांशीसुद्धा संपर्क साधू शकता. सध्या या वेबसाईटस् लोकप्रियतेची अनेक शिखरे पादाक्रांता करीत आहेत. सध्या अनेक राजकीय नेते लोकप्रिय कलावंत, खेळाडू विचारवंत, साहित्यिक हे सामान्य लोकांपर्यंत आपले विचार पोहचविण्यासाठी ब्लॉगच्या माध्यमांचा वापर करीत आहेत.[३]

आज जागतिकीकरणाच्या काळात मराठी साहित्याच्याही कक्षा रुंदावलेल्या दिसतात. संगणक, इंटरनेट, मोबाईल, ब्लॉग, फसबुक वगैरेच्या माध्यमातून मराठी साहित्य जगामध्ये सर्वत्र आवतरत असल्याचे दिसत आहे. इतकेच नव्हेतर आज ज्ञानेश्वर तुकाराम आदि संताचे काव्य जगातील विविध विद्यापीठामध्ये अभ्यासले जाते. जगातल्या विविध भाषेमध्ये त्यांच्या अभंगाचे अनुवाद झाले आहेत. तसेच इंटरनेटद्वारे अनेक मान्यंवर लेखकांचे साहित्य व चरित्र जगापुढे आले आहे ही एक महत्वपूर्ण बाब आहे. जगातल्या इतर देशातील विविध भाषेत लिहिणाऱ्यांचे साहित्य व चरित्र आपणास वाचावयास मिळते. ही सहज प्रक्रिया इंटरनेट द्वारे प्राप्त झाली आहे. त्यामुळे जगातील अनेक गोष्टी, भाषा, संस्कृती, साहित्य, प्रश्न, वेदना आणि इतिहास याची ओळख आपणाला घर बसल्या करून घेता येते. इतकेच

नव्हे तर नोबेल पारितोषिक प्राप्त कलाकृती ई-बुकद्वारे आपणाला वाचायला मिळतात. खरेदी करायला मिळातात. ही महत्वपूर्ण सुविधा आपल्या टेलिव्हिजनद्वारे, संगणकाद्वारे आम्हाला प्राप्त झाली आहे. काही सीडीज्, डीव्हीडीज्, पेनड्राईव्ह, मोबाईलद्वारे अशा नवनवीन कलाकृती आपण पाहू शकतो. वाचू शकतो हे सर्व आपणाला आज सहज साध्य झाले आहे. याचा खूपच फायदा नव्या लेखक पिढीला झाला आहे.

याशिवाय मराठी भाषा साहित्य संस्कृतीसबंधी विपूल माहिती इंटरनेटवरून आज उपलब्ध झालेली आहे. या माहितीचा उपयोग नव्याने लिहिणाऱ्या लेखकाला निश्चित होतो. त्याच बरोबर संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, समर्थ रामदस, साहित्यिक वि.स. खांडेकर, ग.दि. माडगुळकर, पु.ल. देशपांडे, अशा अनेक दिग्गज प्रभूतीच्या जीवन आणि साहित्याची संपूर्ण माहिती देणारी प्रत्येकाची स्वतंत्र संकेतस्थळं आहेत. 'यु ट्यूब' वर वि.स. खांडेकर संग्राहालय घरी बसून आणि विदेशातूनही प्रत्यक्ष पाहता येते. याचा चांगलाच लाभ आजच्या लेखक साहित्यिकांना झाला आहे. इंटरनेटवर मराठीतील ग्रंथ, दिवाळीअंक, चरित्रे वाचता येतात. इंटरनेट हे एक जागतिक वाचनालय आहे. भविष्यात टॅब्लेट पीसीमुळे शाळेतही ई-वाचन सुलभ होणार आहे.[४] इतकेच नव्हे तर मराठी कविता, गाणी ऐकता येतात. इंटरनेटवर बोलकी पुस्तके (टॉकींग बुक) उपलब्ध आहेत या सर्वांचाच फायदा केवळ महाराष्ट्रातीलच नव्हे जगातील मराठी भाषिकांना आणि नव्याने लिहिणाऱ्या तरुण पिढीला झाला आहे.

इंटरनेटवरून आजचे नव्या दमाचे लेखक साहित्यिक एकमेकांशी चर्चा करू शकतात. ई-मेल करून संदेश पाठवून चर्चा करू शकतात, भेटू शकतात. प्रत्यक्ष लिखित स्वरूपात बोलू शकतात. ही सुवर्ण संधी त्यांना प्राप्त झाली आहे. आपण स्वतः लिहिलेली कविता कथा किंवा नाटक हे इंटरनेटच्या माध्यमाद्वारे सगळीकडे पोहचवू शकतात. जगातील अनेक लोकापर्यंत या माध्यमाद्वारे त्यांचे साहित्य पोहचवू शकते. अशी संधी पूर्वीच्या साहित्यिकांना नव्हती. ती आज नव्या विज्ञानामुळे प्राप्त झाली आहे. इंटरनेटवर आज अंतराळ, नेट भेट, माझी सहेली, मिळून साऱ्याजणी, अंर्तनाद, अशी कितीतरी मासिके उपलब्ध आहेत. इंटरनेटवरून मराठी ई-साहित्य संमेलने ही पार पडतात. व पार पडलेली संमेलने इंटरनेटवर पाहता येतात. याचा संपूर्ण उपयोग नव्या लेखकांना झाला आहे.

अनेक वर्तमानपत्रे, साप्ताहिके आज इंटरनेटशी जोडली गेली आहेत. त्यामुळे तीही पाहिजे तेव्हा वाचायला उपयोगी झाली आहेत. तसेच इंटरनेटवरील सर्वच मासिके, साप्ताहिके, वृत्तपत्रे यांचे स्वतंत्र वेबसाईटही आहेत अशा प्रसारमाध्यमांना त्यांच्या ई-मेलवर लेखकांना साहित्य पाठवणे सोपे झाले आहे.

इंटरनेटवर मराठी लिहिताना पूर्वी अडचणी येत. ही गैरसोय आता गुगलने दूर केली आहे. त्यामुळे आता मराठीतून मेल करू शकतो, तसेच विकिपिडीयावर लिहू शकतो.[५] आजच्या नव्या दमाच्या साहित्यिकांना भूलवणाऱ्या या नव्या माध्यमामुळे आकाश ठगणे झाले आहे. आपल्याशी संलग्न झालेल्या हजारो मित्रांना ते एखादी कविता लगेच शेअर करू शकतात. ई-मेलचा वापर करून लगेच एखादा शुभसंदेश पाठवू शकतात. जगभरातील कोणत्याही साहित्यिक मित्रांशी कलावंत मित्राशी ते ई-मेल संदेशाद्वारे बोलू शकतात. ही महत्वपूर्ण क्रांती इंटरनेटमुळे नव्या साहित्यिकांच्या जीवनात झाली आहे. एखादा कार्यक्रम, कौटुंबिक समारंभ, वगैरेचा फोटोही इंटरनेटद्वारे परदेशातून मिळवता येतो, पाठवता येतो. शिवाय हातातील मोबाईलवरूनही तो शेअर करता येतो. परदेशातील मित्रांशी, मैत्रीणींशी, नातेवाईकांशो आपण संवाद करू शकतो. त्यांना इंटरनेटवरून पाहू शकतो ही सहजता आपणाला संगणकाद्वारे प्राप्त झाली आहे. संगणकाचे असे अनेक फायदे नव्या दमाच्या साहित्यिकांनाच नव्हे तर कोणत्याही माणसाला प्राप्त झाले आहेत. संगणकाने खरोखरच नव्या साहित्यिकांच्या जीवनात क्रांती केली आहे. त्यामुळे त्यांचे जीवन बदलून गेले आहे. वेळ, पैसा व बौद्धीक कष्टाची बचत संगणकाच्या प्रगतीने केली आहे. जगामधील नव्या दमाचे साहित्यिक त्यामुळेच संगणक इंटरनेटकडे आकर्षित झाले आहेत. प्रत्येक जण इंटरनेट, वेबसाईट, ब्लॉग, फसबुक, ई बुक, ई-रिडींग, ई-मेल, व्हिडिओ कॉन्फरन्स, मोबाईल, अशा विविध माध्यमांचा वापर करताना दिसून येतो. या सर्वच आधुनिक सुविधांनी साहित्यिक विश्वच नव्हे तर संपूर्ण मानवी जीवन ढवळून काढले आहे. सर्वाच्या जीवनात विज्ञानाने पहाट केली आहे.

परंतु असे जरी असले तरी आज ग्रामीण भागातील साहित्यिकापर्यंत या सुविधा पोहचलेल्या नाहीत. ग्रामीण व दुर्गम भागामध्ये राहणारे किती लोक या सुविधांचा वापर करतात? किती नव्या लेखकांना या सुविधा मिळाल्या आहेत? म्हणजेच इंटरनेचा वापर करणारा शहरी तरुण अथवा शिक्षित वर्गच याचा वाचक आहे. आणि अशा वर्गातीलच लोकांशी इंटरनेटवर मैत्री होते संवाद साधला जातो. असे

काही ठराविक लोकच इंटरनेटचा वापर करून त्यावरील माहिती अथवा साहित्य वापरतात त्यामुळे या सुद्धा माध्यमाला मर्यादा पडतात हे मान्यच करावे लागते.

तसेच आजच्या नव्या दमाचे लेखक इंटरनेटवरून मराठीच्या अथवा कोणत्याही भाषेतील समग्र साहित्याचे आकलन करून घेऊ शकत नाहीत. कारण इंटरनेटवर काही ठराविक माहिती व ठराविक लेखकांचे साहित्य व चरित्र उपलब्ध आहे. त्यामुळे हे वाचणाऱ्या मराठी नव्या दमाच्या लेखकांना समग्र मराठी साहित्य प्रवाह समजून घेण्यासाठी छापील ग्रंथ ग्रंथालयातून मिळवून अथवा विकत घेऊन वाचल्या शिवाय समजणार नाहीत. शिवाय लेखकांचा लेखकांशी व रसिकांशी जो संवाद, भेट पत्रव्यवहार आहे त्यात जो जिव्हाळा प्रेम आपुलकी आहे ती ई-मेल, मोबाईल वरील संभाषात नाही हे मान्यच करावे लागते.

शहरामध्ये राहणारा सुशिक्षित सर्व सुविधा उपलब्ध असणाऱ्यांचा एक वर्ग व ग्रामीण दुर्गम भागात राहणारा कोणतीही सुविधा उपलब्ध नसलेला दुसरा वर्ग अशी तफावत जाणवते. पहिला शहरी वर्ग सर्व तंत्रज्ञानाच्या सुविधा घेऊन इंटरनेटद्वारे जगापुढे आपल्या साहित्याचे प्रदर्शन करणारा, तर दुसरा आपले दर्जेदार लेखन असूनही इंटरनेटच नसल्यामुळे त्यापासून वंचित राहिलेला पण आपल्या गावात भागात प्रसिद्ध पावलेला. मला वाटते संगणकाच्या या प्रगत तंत्रज्ञानामुळे आपल्याच राज्यात देशात तळमळीने लिहिणाऱ्या नव्या दमाच्या साहित्यिकांमध्ये असे दोन वर्ग पडण्याची भिती वाटते आहे.

आज सगळ्याच गोष्टी संगणकावर, इंटरनटवर आल्या आहेत. शिवाय इंग्रजी भाषेमध्ये मग ग्रामीण दुर्गम भागातील सर्व सामान्य या नव्यादमाच्या माणसापर्यंत त्या कधी पोहचणार आणि त्या ज्यावेळी पोहचतील त्यावेळी जग फार पुढे गेलेले असेल.

इंटरनेटवर आलेले साहित्य बऱ्याच वेळा चोरले जाण्याची भिती आहे. वाङ्मय चौर्याचे प्रकार घडताना दिसतात. शिवाय इंटरनेटवर एकमेकांना एखादा मराठी शेर, वात्रटिका, चारोळी पाठविणे शेअर करणे म्हणजे काय? वाङ्मयीन कौशल्य नाही. वाङ्मयीन कौशल्य समजून घेण्यासाठी खूप वाचन, चिंतन, मनन केलेच पाहिजे, साहित्यातील विविध प्रवाह समजून घेतलेच पाहिजेत. अनेक चांगल्या कलाकृती वाचल्याच पाहिजेत. कारण साहित्य निर्मिती ही साधना आहे. साधन नव्हे! याची जाणीव नव्या दमाच्या लेखक, कवी, नाटककार कथाकार यांनी ठेवलीच पाहिजे असे मला वाटते. त्यानंतरच त्यांनी नव्या तंत्रज्ञानाचा वापर करून आपली कलाकृती सर्वश्रृत केली पाहिजे.

***संदर्भसूची :-***

१) नसिराबादकर ल.रा.- व्यावहारिक मराठी-फडके प्रकाशन कोल्हापूर- ९ वी आवृत्ती- ऑगस्ट २०१०, पृष्ठ २०३.
२) पवार जयसिंगराव- सुर्यवंशी निशांत- विज्ञान तंत्रज्ञान आणि प्रगती- फडके प्रकाशन, कोल्हापूर, दुसरी आवृत्ती-२०१२, पृष्ठ ९०.
३) पवार जयसिंगराव-सर्यवंशी निशांत- विज्ञान तंत्रज्ञान आणि प्रगती- फडके प्रकाशन, कोल्हापूर, दुसरी आवृत्ती-२०१२, पृष्ठ ९०.
४) सृजनरंग-इंटरनेट आणि मराठी- सुविद्या प्रकाशन, सोलापूर, प्रथम आवृत्ती, २५ जून २०१३, पृष्ठ ५८.
५) सृजनरंग-इंटरनेट आणि मराठी- सुविद्या प्रकाशन, सोलापूर, प्रथम आवृत्ती, २५ जून २०१३, पृष्ठ ५६-५७.